जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2025
सकाळ

# वि. स. खांडेकरांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठात ज्येष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, रवी लोंढे, डॉ. दत्तात्रय मचाले, श्रीराम सुतार, तबस्सुम पठाण, डॉ. उदयसिंह राजे-यादव, नितीन गंगधर, ऐश्वर्या भुरटे, वैशाली महाडिक आदी उपस्थित होते.

12 JAN 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षांत समारंभाची तयारी गतीमान

## स्वागतासह पदवी प्रमाणपत्र छपाईला वेग : गुरुवारी विद्यापीठात ग्रंथ महोत्सव

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ शुक्रवार १७ जानेवारी रोजी राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. प्रमुख पाहुणे पुणे येथील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा संचालक डॉ. आशिष लेले आहेत. विद्यापीठातील राजमाता जिजाऊ साहेब सभागृहातील दीक्षांत समारंभात गोल्ड मेडल व पीएच. डी. आणि एम. फिल.च्या प्रमाणपत्राचे वाटप केले जाणार आहे. त्यादृष्टीने विद्यापीठात जय्यत तयारी सुरू असून मंडप व पदवी प्रमाणपत्र स्टॉलची उभारणी सुरू आहे. गुरुवार १६ रोजी ग्रंथमहोत्सव होणार असल्याने स्टॉल नोंदणीला वेग आला आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभूमीवर मंडप उभारताना कर्मचारी.

केंद्र शासनाच्या आदेशानुसार दीक्षांत समारंभाला कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, परीक्षा संचालक, डीन आणि प्रमुख पाहुणे यांनी पांढरा पायजमा व कुर्ता तर महिलांनी मोती कलरची साडी त्यावर जॅकिट, गळ्यात मानवस्त्र परिधान करायचा आहे. या सर्व गोष्टींची संपूर्ण तयारी करण्यात आली आहे. मंडप उभारणी सुरू असून प्रत्येक शाखेनुसार पदवी प्रमाणपत्र वितरण करण्याचे स्टॉल उभारले आहेत. तसेच ग्रंथ व खाद्य पदार्थांच्या विक्रीचे स्टॉल तयार करण्यात येणार आहेत.

विद्यापीठ प्रशासनाकडून दीक्षांत समारंभाच्या कामासाठी विविध प्रकारच्या समित्या स्थापन करून प्रत्येकाला काम वाटून दिली आहेत. प्रत्येक कमिट्यांच्या बैठकांना वेग आला असून, दीक्षांत समारंभाची जय्यत तयारी सुरू आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2025
लोकमत

# विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तरला विजेतपद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय महिला सॉफ्टबॉल स्पर्धेत विद्यापीठाच्या यूजी आणि पीजी डिपार्टमेंटच्या महिला खेळाडूंनी विजेतपद पटकावले. करांड येथील वेणूताई चव्हाण कॉलेजमध्ये या स्पर्धा पार पडल्या. विजयी संघात स्वप्नाली वायदंडे, धनश्री कांबळे, सदिया पटेल, तब्बसूम छडेदर, अपूर्वा पाटील, तनुजा कदम, अश्वर्या पुरी, पौर्णिमा हिटमुडे, करिश्मा कुडचे, पल्लवी कांबळे, प्रियांका अंची, निशा अवळे यांचा समावेश आहे. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्रकुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन मिळाले. प्रा. सुचय खोपडे, डॉ. राजेंद्र रायकर, प्रा. किरण पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले.